# राज्य राजकारण:
## मुद्दे आणि पेचप्रसंग



संपादक
डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे
डॉ. माधव माणिकराव चोले

12. घटक राज्यातील राज्यपालाचे वास्तविक स्थान आणि वाद 74
—डॉ. डी. एस. पटवारी

13. राज्यांच्या राजकारणात जातींच्या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास 85
—प्रा. डॉ. इकबाल खान गफार खान

14. राजकारण आणि जात 89
—प्रा.डॉ. जगदीश देशमुख

15. महाराष्ट्र प्रशासन : सध्यस्थितीतील आव्हाने आणि उपाययोजना 95
—डॉ. मोरे मंचक रंगनाधराव

16. आरक्षणाची संविधानिक वाटचाल : एक दृष्टीक्षेप 99
—प्रा.डॉ.बी.एम.नरवाडे

17. एक राष्ट्र एक निवडणुक प्रयास आणि विपर्यास? 103
—प्रा. डॉ. प्रभाकर ग. जाधव

18. प्रादेशिक पक्षाचे बदलते राजकीय स्वरूप 111
—डॉ.साहेब राठोड, गणेश एम.कचरे

19. सोशल मीडिया : लोकमत आणि राजकारण 116
—प्रा. डॉ. संजय कोनाळे

20. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचा वैचारीक गोंधळ आणि भविष्यातील समस्या 120
—सौ. प्रकृती श्रीकांत कारेगावकर

21. भारतातील प्रादेशिकवादाचे स्वरुप 126
—डॉ. पी. डी. सूर्यवंशी

22. केंद्र-राज्य संबंधात घटक राज्याची दुर्बलता : एक अभ्यास 130
—प्रा. डॉ. नवनाथ गोविंदराव अडकिने

23. भारतीय संघराज्य आणि स्वायत्ततेचा प्रश्न 137
—शिवरुद्र शरणप्पा बदनाळे

24. घटकराज्यातील जबाबदार शासनपध्दतीः ऐतिहासिक परिप्रेक्ष्य 140
— प्रा. डॉ. अजय वसंतराव गव्हाणे

25. पक्षांतर बंदी कायदा : एक विश्लेषण 146
—प्रा. डॉ. सचिन रामराव काळबांडे

26. भारतीय संघराज्यातील आंतरराज्यीय नदी जलविवाद आणि आंतरराज्यीय सीमावाद 149
—डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर

27. आरक्षण समस्या : एक अभ्यास 158
—प्रो. डॉ. मानवते उत्तम हुसनाजी

# 23. भारतीय संघराज्य आणि स्वायत्ततेचा प्रश्न

***शिवरुद्र शरणप्पा बदनाळे***

*सहा. प्राध्यापक व विभाग प्रमुख महाराष्ट्र*

*महाविद्यालय निलंगा. जि लातूर.*

भारतीय राज्यघटनेने संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे हे आपल्या राज्यघटनेचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. घटनेतील कलम एक नुसार भारत हा एक राज्यांचा संघ असेल असे नमूद करण्यात आले आहे. राज्यघटनेत (fed-eration) हा शब्द वापरला नसला तरी घटनाकारांना संघराज्य व्यवस्थाच अपेक्षित होती असे दिसते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की (union) या इंग्रजी शब्दाचा अर्थ संघराज्य असाच अपेक्षित होता. तसेच आपल्या राज्यव्यवस्थेत संघराज्याचेच गुण अधिक आहेत असे के सी व्हीअर हे सुद्धा म्हणतात, म्हणूनच त्यांनी भारताला निम संघराज्य असे म्हटले आहे.

परंतु ही संघराज्यात्मक व्यवस्था केंद्रप्रधान आहे. कारण शेषाधिकार केंद्र शासनाकडे देण्यात आलेले आहेत परिणामी केंद्र सरकार राज्यांच्या तुलनेत अधिक शक्तिशाली बनले आहे. भारतीय संघराज्य व्यवस्था अमेरिकी सारखी नाही कारण भारतीय घटनाकारांनी भारतात एकात्मता टिकून राहावी, फुटीरतेची वृत्ती वाढीस लागू नये याचा विचार करून राज्यांना अधिक अधिकार अथवा स्वायत्तता प्रदान केलेली नाही. देशातील प्रदेशांची स्वतंत्र ओळख संस्कृती कायम ठेवून राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रबळ केंद्र सरकार असणारे संघराज्य घटनेने निर्माण केले गेले.

राज्य स्वायत्ततेचा प्रश्न-केंद्र व राज्य यांच्यातील अधिकार विभागणीची व्यवस्था विकेंद्रीकरणाच्या मूलभूत सिद्धांताचा भंग करणारी ठरेल अशी घटना समितीतील काही सदस्यांनी व्यक्त केलेली शंका नंतरच्या काळात सत्य ठरवू लागली. शक्तिशाली केंद्र सरकारच्या तुलनेत राज्यांना कमी अधिकार दिले गेले. 1967 पर्यंत विषम अधिकार विभागणी असतानाही केंद्र व राज्य यांच्यात संघर्ष नव्हता कारण केंद्र व राज्यात काँग्रेस पक्षाची सत्ता होती. पण जेव्हा विषम पक्षाचे शासन विविध घटक राज्यातून स्थापन होऊ लागले तेव्हा केंद्र व राज्य यांच्यातील विषम अधिकार

विभागणीची समस्या पुढे आली. यातूनच काही घटक राज्यांनी संघराज्यातून बाहेर पडण्याची धमकी दिली तर काहींनी घटक राज्यातील शासनात केंद्राने हस्तक्षेप कमी करावा अशी मागणी पुढे केली. राज्याचे केंद्रावरील परावलंबन दूर करून राज्यांना राजकीय आणि आर्थिक स्वायत्तता द्यावी अशी मागणी पुढे येऊ लागली. पण या उलट 42 व्या घटनादुरुस्तीने हा प्रश्न अधिक वाढवण्यात आला. या घटना दुरुस्ती मुळे संसदेला मिळालेला अमर्याद अधिकार त्यात राज्याच्या प्रशासनात हस्तक्षेप करणे राज्य सूचीतील विषयांचा समवर्ती सूचीत समावेश करणे आणि न्यायपालिकेची स्थिती कमकुवत करणे, घटक राज्यात सैनिक पाठवणे या तरतुदी एका सुदृढ संघराज्यासाठी हानिकारक ठरल्या. या सर्व गोष्टींना घटक राज्यांमधून तीव्र विरोध झाला. केंद्राच्या या अनावश्यक आणि अतिरिक्त हस्तक्षेपामुळे अनेक घटक राज्यांनी स्वायत्तेची मागणी पुढे केली.

**स्वायत्ततेची मागणी :** राज्य स्वायत्ततेचा अर्थ असा की राज्याच्या अंतर्गत व्यवहारात केंद्राचा हस्तक्षेप कमी करून राज्यांना घटनेनुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर सहजपणे करता यावा असे आहे. मात्र प्रबळ केंद्र सरकारच्या निर्मितीमुळे घटक राज्यांना दुय्यम स्थान प्राप्त झाले परिणामी भारतातील मार्क्सवादी पक्ष, अकाली दल, तेलगू देसम, डी. एम. के., नॅशनल कॉन्फरन्स, या पक्षांचे सरकार असणाऱ्या राज्यांमधून स्वायत्ततेची मागणी पुढे येऊ लागली एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 75 टक्के वाटा घटक राज्यांना मिळावा, राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांवर राज्य सरकारचे नियंत्रण असावे, योजना आयोगाच्या कार्यपद्धती बदल केला जावा, राज्याच्या विधानसभांना केंद्राच्या बरोबरीने सार्वभौम सत्ता मिळावी, राज्य विधानसभेने मंजूर केलेल्या कोणत्याही विधेयकास केंद्राच्या संमतीची गरज नसावी, राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करू नये. अशी स्वायत्ततेची मागणी पुढे येऊ लागली. तसेच राज्यांना अधिक आर्थिक स्वायत्तता देण्यात यावी. अन्यथा त्यांच्या वरील जबाबदाऱ्यांना अर्थ राहणार नाही असे म्हटले जाऊ लागले. पंजाबचे तत्कालीन मुख्यमंत्री प्रकाश सिंह बादल यांच्या मते, केंद्राची सुदृढता राज्याच्या सदृढतेवर अवलंबून आहे. त्यामुळे राज्यांना अधिक स्वायत्तता मिळावी ही भूमिका व्यक्त केली. तामिळनाडूचे मुख्यमंत्री अण्णा दुराई यांच्या मते भारतीय संविधान निर्मात्याने द्वारा निर्धारित स्वायत्ततेचा सिद्धांत व्यवहारात आणण्याची गरज आहे संघात्मक संविधानात आदर्श केंद्राकडून सार्वभौमत्व आणि देशाच्या एकतेचे संरक्षण होईल तेवढीच सत्ता वापरावी. त्याच्याशी नगरपालिकेसारखा व्यवहार करू नये. अशा स्वःपाच्या मागण्या मोठ्या स्वरूपात होऊ लागल्यामुळे पुढे भारत सरकारने न्यायमूर्ती सरकारीया आयोगाची निर्मिती करून केंद्र राज्य संबंधाचा पुनर्विचार सुरू केला. मात्र सरकारीया

आयोगाने राज्य स्वायत्तेच्या दृष्टीने शिफारशी करताना राज्यांना अधिक अधिकार देण्यासाठी घटनेची घटनेत दुरुस्तीची गरज नाही असे सांगितले कारण राज्यांना घटनेने अधिक स्वातंत्र्य देण्याची व्यवस्था केलेली आहे असे म्हटले.

**सारांश** : भारतात विविध घटक राज्यांकडून आर्थिक, राजकीय, भाषिक इत्यादी कारणाने स्वायत्ततेची मागणी स्वातंत्र्योत्तर काळापासून सातत्याने होत आली आहे मात्र इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, चंद्रशेखर, अटल बिहारी वाजपेयी या नेतृत्वांनी पंडित नेहरू प्रमाणे राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेला प्राधान्य देऊन राज्याच्या अमर्याद स्वायत्ततेच्या मागणीला प्रखर विरोध केला. राज्यांच्या स्वायत्ततेच्या वाढत्या वाढत्या मागण्याबाबत कोणतेही केंद्र सरकार राज्यांना संतुष्ट करू शकत नाही. यामुळे या मागणीवरून भारतातील केंद्र राज्य संबंध सतत तणावपूर्ण राहिले आहेत देशहितासाठी करण्यात येणाऱ्या कायद्यांना देखील स्वायत्ततेची मागणी करणारी राज्य विरोध करतात. भारताने जी संघराज्य पद्धती स्वीकारली आहे तीच भारतासाठी उपयुक्त वाटते. तरीही घटना अमलात आल्यापासून अनेक प्रश्न निर्माण झाले उदाहरणार्थ प्रादेशिक वाद व त्यातूनच प्रादेशिक अस्मिता व स्वायत्ततेचा प्रश्न अशा प्रश्नांना जास्त लांबवत न ठेवता ते लवकरात लवकर सोडवणे भारतीय लोकशाहीसाठी गरजेचे आहे जसे केंद्राला राज्याच्या बाबतीत अधिक अधिकार असले तरी त्यांनी त्या अधिकाराचा दुरुपयोग करता कामा नये व राज्यांनी देखील राष्ट्राचे ऐक्य हित लक्षात घेऊन केंद्राशी सहकार्य करणे गरजेचे आहे त्यासाठी कुठल्याही राजकीय पक्षाने अथवा नेतृत्वाने स्वायत्ततेची मागणी करताना राष्ट्रीय एकात्मतेला व अखंडतेला धक्का लागू देऊ नये.

## संदर्भ


1. सुधाकर जोशीरू ''भारतीय शासन आणि राजकारण'', विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद. 2003
2. भोळे भा.ल. भारताचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे आणि कं., पब्लिशर्स तिसरी आवृत्ती, नागपूर, 2008.
3. राजेंद्र होरा व सुहास पळशीकर, राज्यशास्त्रा कोश, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, 1987.
4. पाटील बी. बी. भारतीय राज्य शासन, फडके प्रकाशन पुणे. 2007
5. पाटील व्ही. बी. भारतीय राज्यव्यवस्था, के सागर प्रकाशन, प्रथम आवृत्ती पुणे, 2008.